शासकीय कार्यालयांना लागणा-या वेगवेगळया “  यंत्रमाग कापड (हातमाग कापडाशिवाय), गादी, उशी, बेडशिट, पिलो कव्हर, ब्लॅकेट/रजई, चादर, शालेय गणवेष, स्वेटर, ट्रॅक सूट, रेनकोट, स्कुल बॅग  इत्यादी ” वस्त्रोद्योग बाबींचा सन २०२६-२७ या सालाकरीता दरकरार करणेबाबत.

ई-निविदा फॉर्म

निविदा फॉर्मची किंमत रु. १०,०००/-

बयाणा रक्कम रु. १,००,०००/-

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ हे राज्यातील यंत्रमाग सहकारी संस्था/एम.एस.एम.ई अंतर्गत महामंडळाकडे नोंदणीकृत घटक/संस्था यांच्याकडून शासनाने निर्धारित केलेल्या तांत्रिक निकष विचारात घेऊन वेगवेगळया वस्त्रोद्योग बाबींचा पुरवठा हा या ई-निविदाद्वारे निश्चित करण्यात येणा-या दरकरारानुसार शासकीय/निमशासकीय कार्यालयांना करण्यात येईल.

महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाकडे नोदंणीकृत असलेल्या रा.स.वि.नी. योजनेअंतर्गत ज्या सहकारी संस्थांना राज्य शासनामार्फत अर्थसाहय करण्यात आलेले आहे अश्या संस्था, अन्य यंत्रमाग सहकारी संस्था व लघु व सूक्ष्म उद्योगाअंतर्गत नोंदणीकृत असलेल्या संस्थांची वेगवेगळया वस्त्रोद्योग बाबींचा पुरवठा शासकीय/निमशासकीय कार्यालयांना करण्याकरीता दरकरार सन २०२६-२७ सालाकरीता निश्चित करणेसाठी उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दि. ०१.१२.२०१६ मधील परिच्छेद ३.२.५ मधील तरतुदीनुसार सदर ई-निविदा मागविण्यात येत आहे. त्याच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

## -: अटी व शर्ती :-

१. महामंडळाकडे नोंदणीकृत असलेल्या संस्था व्यतिरिक्त इतर संस्थांना ई-निविदेत सहभाग घेता येणार नाही.

२. ई-निविदा फॉर्म खरेदी व ऑनलाईन तयारीची (प्रिपरेशन) अंतिम तारीख दि. २५/०५/२०२६ रोजी सांयकाळी ५:०० वाजेपर्यंत राहील.

३. ई-निविदा दिनांक ०५/०५/२०२६ रोजी दु.१:०० वाजेपासून http:// mahatenders.gov.in या संकेत स्थळावर (वेबसाईट) उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

४. निविदाकारांनी कोरी निविदा फॉर्म फी, बयाणा रक्कम व सेवा शुल्क ऑनलाईन पेमेंट गेटवेद्वारे भरावयाचे आहे. वरील सर्व शुल्क डेबिट कार्ड, नेट बॅकिंग, RTGS, NEFT मार्फत भरणा करता येतील.निविदा फॉर्म फी शुल्क व बयाणा रक्कम रोखीने, धनादेश किंवा धनाकर्षाद्वारे महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळात स्वीकारली जाणार नाही, उद्योग, ऊर्जा व कामागार विभाग शासन निर्णय दि. ०१.१२.२०१६ मधील परिशिष्ट ८ मध्ये नमूद असलेल्या संस्थांना निविदा शुल्क व बयाणा रक्कम भरण्यापासून सूट देण्यात येत आहे.

५. उपरोक्त मुदतीत प्राप्त झालेल्या ई-निविदा शक्य झाल्यास उपस्थित अथवा त्यांचे प्रतिनिधी याचे समक्ष दिनांक २६/०५/२०२६ रोजी दुपारी २:०० वाजता अथवा इतर सोयीच्या दिवशी महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाकडून उघडण्यात येतील.

६. पुरवठादाराने ई-निविदा पत्रात मालाचे/साहित्याचे दर विहित केलेल्या रकान्यात स्पष्ट अंकात व अक्षरात खाडाखोड न करता भरावेत.

... पुढे पहा ...२/-

७. ई-निविदा फॉर्ममधील पुरवठा करण्यात येणा-या मालाचा दर स्थानिक संस्था कर व इतर सर्व करांसह व वाहतूक खर्चासह भरणेचा आहे. सदर खर्चामध्ये पॅकींग, प्रिटींग,डाईंग/प्रोसेसिंग, वाहतूक, लोडींग अनलोडींग तसेच प्रशासकीय खर्च व महामंडळाचे सेवा शुल्क इ. बाबींचा समावेश राहील. सदर मंजूर दराव्यतिरिक्त इतर कुठलाही खर्च महामंडळाकडून अदा केला जाणार नाही.

८. ई-निविदा सादर करताना निविदा पत्रक पोष्टाने किंवा कुरीयरने पाठवू नये. पोष्टाने व कुरीयरने पाठविलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. ई-निविदा महामंडळाने ठरवून दिलेल्या तारखेपर्यंत व वेळेत ऑनलाईन http://mahatenders.gov.in येथे सादर करणे बंधनकारक आहे.

९. ई-निविदेमधील दर पूर्णपणे किंवा अंशत: स्वीकारणे किंवा आलेल्या सर्व ई-निविदा नाकारणेचा अधिकार मा.कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ यांना राखून ठेवला आहे.

१०. आलेल्या ई-निविदा शक्य असल्यास निश्चित केलेल्या तारखेला व वेळेवर उपस्थित निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांच्या समक्ष उघडण्यात येतील. सशर्त ई-निविदा नाकारण्यात येतील.

११. ई-निविदेसोबत भरलेल्या बयाणा रक्कमेवर कोणत्याही स्वरुपात व्याज दिले जाणार नाही.

१२. संस्थांनी ई-निविदा भरताना दोन लिफाफा पध्दतीचा अवलंब करुन त्यापैकी अ.क्र. एकचे लिफाफयात तांत्रिक बाबींची व दुस-या लिफाफयात वित्तीय बाबींची कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावीत.

१३. निविदा उघडण्याच्यावेळी प्रथम लखोटा क्रं.१ उघडण्यात येईल. लखोटा क्र.१ मध्ये आवश्यक कागदपत्रे पूर्ण समाधानकारक असलेल्या संस्थांचे वित्तीय पत्रक उघडले जाईल.

१४. ई-निविदा अर्जामधील तपशील (Specification) नुसार व नमुन्यानुसार संस्थांनी मालाचा पुरवठा करणे बंधनकारक राहील. ऐनवेळी शासनास/महामंडळास वेगवेगळया वस्त्रोद्योग बाबींचे स्पेसिफिकेशन बदलण्याचा अधिकार राहील. परंतू ई-निविदामध्ये प्राप्त एल-१ (सर्वात कमी) दरात कोणतीही वाढ मिळणार नाही.

१५. निविदा मंजूर झाल्यानंतर शासकीय कार्यालयाच्या आवश्यकतेनुसार कमी अधिक प्रमाणात जशी आवश्यकता असेल, तसे कार्यादेश संस्थांना वेळोवेळी देण्यात येतील व मंजूर केलेल्या दराप्रमाणे तपशील (Specification) नुसार साहित्य पुरविणे नोंदणीकृत संस्थांना बंधनकारक राहील. याबाबत कोणत्याही प्रकारची भाववाढ मिळणार नाही. या ई-निविदामध्ये नमुद साहित्याची एकूण मागणी ( वस्तू व संख्या इ.) ही शासकीय/निमशासकीय कार्यालयांनी महामंडळाकडे नोंदविलेल्या /नोंदविण्यात येणा-या एकूण मागणी ( वस्तू व संख्या इ.) प्रमाणे राहील.त्यानुसार नोंदणीकृत पुरवठादार संस्थांनी सदर कार्यालयांना पुरवठा करावा लागेल.

**.. पुढे पहा ...३/-**

१६. दिलेला माल हा निविदेतील तपशील (Specification) नुसार नसल्यास नाकारला जाईल, न स्वीकारलेला माल १५ दिवसांच्या आंत संबंधित संस्थांनी ज्या ठिकाणी पुरविलेला असेल त्या ठिकाणहून नेला पाहिजे.

१७. तक्रारीमध्ये तथ्य असल्यास विनाविलंब (Specification) सुधारीत साहित्याचा पुरवठा करावा लागेल.

१८. मंजूर निविदाधारकाने अंशत: किंवा पूर्णत: काम करण्यास असमर्थता दर्शविल्यास त्याची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल व त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१९. कार्यादेश मिळाल्यापासूनचे दिनांकपासून कार्यादेशात नमुद केलेल्या दिवसांच्या आत नोंदणीकृत संस्थांनी मालाचा पुरवठा करावा लागेल याबाबत मुदतवाढ देणे किंवा नाकारणे याचा अधिकार मा.कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ यांचे राहील.

२०. मंजूर निविदाकार उपनिविदाकार नेमू शकत नाहीत, असे केल्यास निविदा रदद करण्यात येऊन मंजूर निविदाकारावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

२१. निविदेमध्ये नमुद केलेले कोणते साहित्य खरेदी करावयाचे किंवा नाकारण्याचे आहे. त्याचे अधिकार महामंडळास राहील.

२२. महामंडळाने व शासकीय कार्यालयांने अप्रमाणित केलेला माल निविदाकाराने स्वखर्चाने त्वरीत परत नेला पाहिजे व बदलून दिला पाहिजे.

**२३. संस्थांकडून प्राप्त एल-१ (सर्वात कमी ) दर हे महामंडळाकडे नोंदणीकृत असलेल्या सर्व संस्थांना लागू राहतील .**

२४. नोंदणीकृत संस्थांनी वस्त्रोद्योग बाबींचा पुरवठयाचे उत्पादन राज्यातील रा.स.वि.नी. योजनेअंतर्गत अर्थसाहय प्राप्त यंत्रमाग सहकारी संस्था/सहकारी संस्था/एम.एस.एम.ई संस्थेंवरच करणे बंधनकारक आहे.

२५. नोंदणीकृत संस्थेने वस्त्रोद्योग बाबींचा पुरवठा शासकीय/निमशासकीय कार्यालयास करणे आवश्यक आहे. पुरवठयासंबंधी येणारा वाहतूक खर्च, पॅकिंग व इतर खर्च नोंदणीकृत पुरवठादार संस्थेस करावा लागेल.

२६. नोंदणीकृत पुरवठादार संस्थेस शासकीय/निमशासकीय कार्यालयास आवश्यक असणा-या वस्त्रोद्योग बाबींचा पुरवठा महामंडळाने दिलेल्या विनिर्देशाप्रमाणे,नमुन्याप्रमाणे तसेच आदेशात नमुद केलेल्या विवरणापत्रानुसार करावा लागेल.

२७. नोंदणीकृत पुरवठादार संस्थेस महामंडळाकडे देयक सादर करतेवेळी संबंधित शासकीय/निमशासकीय कार्यालयास साहित्याचा पुरवठा केल्यासंबंधी पुरावा/प्रमाणपत्र सादर करावे लागेल. तद्नंतर देयकाची अदायगी करण्यात येईल.

**... पुढे पहा ...४/-**

२८. शासकीय/निमशासकीय कार्यालयाकडून साहित्याच्या पुरवठयासंबंधी रक्कम महामंडळास प्राप्त झाल्यानंतर सदरची रक्कम महामंडळाचे सेवा शुल्क वसूल करुन नोंदणीकृत पुरवठादार संस्थेंस अदा करण्यात येईल. देयके अदा करण्यास विलंब झाल्यास नोंदणीकृत पुरवठादार संस्थेस कोणत्याही प्रकारचे व्याज देण्यात येणार नाही अथवा नोंदणीकृत पुरवठादार संस्थेस तशी मागणी करता येणार नाही अथवा न्यायालयात दाद मागता येणार नाही.

२९. महामंडळाचे सेवा शुल्क ठरविण्याचा सर्व अधिकार महामंडळाच्या संचालक मंडळास / कार्यकारी संचालकाना राहील. यामध्ये कोणताही बदल करता येणार नाही.

३०. साहित्याच्या पुरवठयापोटी राज्य शासन/ केंद्र शासन यांनी वेळोवेळी ठरवून दिलेले कर व इतर अनुषंगीक करांची कपात नोंदणीकृत पुरवठादार संस्थेस देय असलेल्या रक्कमेतून वसूल करण्यात येईल.

३१. नोंदणीकृत संस्थेकडून वस्त्रोद्योग बाबींचा पुरवठा शासकीय/निमशासकीय कार्यालयास वितरण करण्यास उशीर झाल्यास किंवा साहित्य खराब असल्यास महामंडळाकडून/शासकीय कार्यालयाकडून आकारण्यात येणारा दंड/व्याज इ.नोंदणीकृत पुरवठादार संस्थेकडून वसूल केला जाईल.तसेच साहित्याच्या पुरवठयासंबंधी तक्रार आल्यास पुरवठा केलेले साहित्य स्वत:च्या खर्चाने परत घेऊन बदल्यात चांगले साहित्य स्वखर्चाने देण्याची जबाबदारी नोंदणीकृत पुरवठादार संस्थेची राहील.

३२. नोंदणीकृत संस्थेची मागणी कमी/अधिक बदल करण्याचे अधिकार महामंडळास राहतील. पुरवठयासबंधी शासकीय/निमिशासकीय कार्यालयाने मागणी केल्यास बँक गॅरंटी/अनामत रक्कम संस्थेस महामंडळाकडे जमा करावी लागेल.

३३. पुरवठयासंबंधी कोणताही वाद निर्माण झाल्यास तसेच काही वितृष्ट/मतभेद आल्यास याबाबत शासनाने व महामंडळाने घेतलेला निर्णय अंतिम राहील.

३४. नोंदणीकृत संस्था शासकीय/निमशासकीय कार्यायलास पुरवठा करण्यास अपयशी/ असमर्थ ठरल्यास संबंधित मागणी इतर नोंदणीकृत पुरवठादार संस्थांकडे वर्ग करण्यात येईल व आवश्यक वाटल्यास संबंधित पुरवठादार संस्थेस काळया यादीत समाविष्ट करण्यात येईल.

३५. नोंदणीकृत संस्थेने साहित्याचा पुरवठा वेळेवर केला नाही तर या शासनास/महामंडळास येणारा अतिरिक्त खर्च नोंदणीकृत पुरवठादार संस्थेंकडून वसूल करण्यात येईल. तसेच पुरवठादार संस्थेंस कोणत्याही कारणास्तव मध्येच पुरवठा बंद करता येणार नाही.

३६. पुरवठा करण्यात आलेल्या साहित्याचे प्रयोगशाळा तपासणी करण्याचे अधिकारी महामंडळास/शासनास राहतील. याकरीता Random पध्दतीने नमुने प्रयोगशाळा तपासणी करण्याकरीता काढण्यात येतील.

... पुढे पहा ...५/-

३७. वेगवेगळया वस्त्रोद्योग बाबींच्या पुरवठयासंबंधी सर्व शासन निर्णय/परिपत्रके/करार तसेच शासकीय/निमशासकीय कार्यालयाच्या मागणी पत्रातील सर्व अटी शर्ती संस्थेंस लागू/बंधनकारक राहतील.

३८. करारनाम्यातील अटी शर्तीमध्ये बदल करण्याचे सर्वस्वी अधिकार महामंडळाच्या कार्यकारी संचालकांना राहतील.

३९. नोंदणीकृत संस्थेने निविदेत नमुद केलेल्या दरामध्ये महामंडळाच्या सेवा शुल्काचा समावेश असेल. निविदेत प्राप्त झालेले दराचा कालावधी एक वर्षाचा राहील. कालावधी वाढविण्याचे किंवा कमी करणेचे संपूर्ण अधिकार मा. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ यांना राहतील.

४०. कोणतेही न्यायालयीन प्रकरण उदभवल्यास न्यायालयीन कार्यक्षेत्र नवी मुंबई, जि. ठाणे हे राहील.

दिनांक :-

ठिकाण :- महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, नवी मुंबई.

सही/-
कार्यकारी संचालक
महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित,
नवी मुंबई-४०० ७०६.

मी वरील अटी - शर्ती वाचल्या असून त्या मला मान्य असून मला बंधनकारक आहेत.

निविदाधारकाची सही व शिक्का

**निविदा धारकाच्या पात्रतेसाठी खालील कागदपत्रे निविदे सोबत जोडणे आवश्यक आहे.**

| | |
|---|---|
| १ | महामंडळाकडे नोंदणीकृत असलेल्या संस्था निविदेत (निविदा भरण्यास) भाग घेऊ शकतील याबाबतचा पुरावा (जसे नोंदणी करारनामा किंवा नोंदणी शुल्क भरलेली पावती जोडणे आवश्यक आहे.) |
| २ | निविदाधारकाने दुकान आणि आस्थापना प्रमाणपत्र /कंपनी/संस्था नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. |
| ३ | मागील ३ आर्थिक वर्षामधील टर्न ओव्हर प्रमाणपत्र/प्राप्तिकार रिटर्न/ताळेबंद / नफा आणि तोटा खात्याची प्रत अपलोड करावी. |
| ४ | निविदाधारक काळया यादीत नसल्याबाबतचे रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र-ई |
| ५ | अनुभव प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. |
| ६ | निविदाधारकाने परिशिष्ट ब मध्ये अटी-शर्ती मान्य असल्याबाबत हमीपत्र देणे आवश्यक आहे. |
| ७ | निविदामध्ये नमुद केलेल्या गुणवत्तेप्रमाणे माल पुरवठा करण्यास बांधील असल्याबाबत परिशिष्ट ड मध्ये हमीपत्र देणे आवश्यक आहे. |
| ८ | निविदाधारकाने GST नोंदणी प्रमाणपत्र प्रत /पॅन कार्ड/ उद्योम आधार इ.सादर करणे आवश्यक आहे. |
| ९ | Online ई-निविदा फॉर्म फी व बयाणा रक्कम भरणा केलेली पावती किंवा सूट असल्याबाबतची कागदपत्रे. |

परिशिष्ट - अ

निविदाधारकाची माहिती

| | | | |
|---|---|---|---|
| नोंदणीकृत संस्थेचे नांव व पत्ता | | | |
| पुरवठा क्षमता -प्रति दिन | | | |
| संस्थेचा नोंदणी क्रं. | | | |
| वस्तू व सेवाकर (GST) नोंदणी क्रमांक/दिनांक | | | |
| PAN Card No. | | | |
| निविदाकामी प्राधिकृत प्रधिनिधीचे नांव व भ्रमणध्वनी क्रं. | | | |
| संस्थेंची उलाढाल.<br>( लाखामध्ये) Turnover | सन २०२२-२३<br>सन २०२३-२४<br>सन २०२४-२५<br>सन २०२५-२६ | ...<br>...<br>...<br>... | (रु. लाखात) |
| दुरध्वनी क्रं. व फॅक्स क्रं. | | | |
| संस्थेंचे संकेतस्थळ व ई-मेल आयडी | | | |

निविदाधारकाची सही व शिक्का

# परिशिष्ट - ब

प्रति,
मा. कार्यकारी संचालक
महाराष्ट्र राज्य यंत्रामाग महामंडळ मर्या.
नवी मुंबई-४०० ०७६.

विषय :- वेगवेगळया वस्त्रोद्योग बाबींचा पुरवठा करणेबाबत.

महोदय,

महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाच्या वरील निविदेचे सर्व नियम व अटी मी / आम्ही वाचल्या असून त्यासंबंधीची सर्व माहिती समजून घेतली आहे. निविदेसंबंधी मला/आम्हाला कोणत्याही प्रकारची शंका राहिलेली नाही. सर्व शंकाचे निरसन झालेले आहे. हे निविदापत्र मी/आम्ही लक्षपूर्वक भरले आहे.

मला/आम्हांस निविदा मंजूर झाल्यास मी/आम्ही महामंडळाच्या मागणी पत्रकाप्रमाणे सर्व मालाचा पुरवठा वेळेवर मुदतीत करु, या निविदेचे नियम व अटी मला/ आम्हाला बंधनकारक आहेत.

दिनांक :-

निविदाधारकांची सही :-

शिक्का :-

नांव :-

संपूर्ण पत्ता :-

## परिशिष्ट - क

प्रति,
मा. कार्यकारी संचालक
महाराष्ट्र राज्य यंत्रामाग महामंडळ मर्या.
नवी मुंबई-४०० ०७६.

विषय :- प्राधिकार पत्र.
(वेगवेगळया वस्त्रोद्योग बाबींचा पुरवठा करणेबाबत.)

महोदय,

आम्ही ------------------------------------------एक नावाजलेले उत्पादक / वितरक असून ----------------------------------------वस्तूचे उत्पादन आमच्या ---------------------------------------------------------------------------------------------------------- या ठिकाणी करीत आहोत. या संदर्भात आम्ही ------------------------------------------------ यांना आमच्या कंपनीचे उत्पादित वस्तूंसाठी निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेणे, दर ठरविणे, कॉन्ट्रॅक्ट प्रमाणे अतिमत: पुरवठा पूर्ण करणे यासाठी सर्वस्वी अधिकार या विशेष निविदा नोटीस क्रमांक ----------------------------दिनांक ------------------ साठी देत आहोत.

हे अधिकार कंपनी किंवा व्यक्तिला मे.------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------- यांना अधिकृतपणे या विशेष निविदाच्या बाबतीत निविदा प्रक्रियेत भाग घेणे, दर ठरविणे व करार अंमलात आणणे यासाठी आहेत. हे प्राधिकार पत्र ज्या संस्थेंस दिले जाईल त्यांच्या व्यतिरिक्त इतर संस्थेंस कंपनी जबाबदार राहणार नाही.

आपला विश्वासू,

(उत्पादकाचे नांव)

टिप :- सदरचे प्राधिकार पत्र हे उत्पादकांच्या लेटरहेडवर दिले जाईल आणि प्राधिकार पत्र देणारे हे उल्लेखलेल्या उत्पादकांचे सक्षम अधिकारी असतील. त्यांनी दिलेल्या प्राधिकार पत्रानुसार ते जबाबदार असतील.

## परिशिष्ट - ड

प्रति,
मा. कार्यकारी संचालक
महाराष्ट्र राज्य यंत्रामाग महामंडळ मर्या.
नवी मुंबई-४०० ०७६.

विषय :- हमीपत्र.
(वेगवेगळया वस्त्रोद्योग बाबींचा पुरवठा करणेबाबत.)

महोदय,

मी/आम्ही याद्वारे हमीपत्र देत आहे/आहोत की, मी/आम्ही निविदामधील विनिर्देशाप्रमाणे वेगवेगळया वस्त्रोद्योग बाबींचा निविदामधील अटी-शर्तीनुसार शासकीय/निमशासकीय कार्यालयांना पुरवठा करण्यास मी/आम्ही बांधील आहे/आहोत.

दिनांक :-

निविदाधारकांची सही :-

शिक्का :-

नांव :-

संपूर्ण पत्ता :-

परिशिष्ट - ई

To,
The Managing Director,
Maharashtra State Powerlooms
Corporation Limited,
Navi Mumbai-400 706.

Sub: Certificate.
Ref: E-Tender No.02 for year 2026-27

We declare that we have not been deregistered or blacklisted or suspended for any product or constituent of the product we have quoted, any State Government/Central Government/Government undertakings/Local Authority till the due date of submission of bid as specified in the bid document. If we, at a later date, are found guilty of suppressing facts in this regard, such act on our part, shall be considered a fraudulent practice and The Managing Director, Maharashtra State Powerlooms Corporation Limited, Navi Mumbai-400 706 shall be entitled to reject our Bid and or resend the contract, if awarded and forfeit the Earnest Money Deposit/Performance Security Deposit submitted by us against this E-Tender No.02 for year 2026-27.
We have also noted that after submission of Bid and before Award of Contract. If we are de- registered or blacklisted by any State Government/Central Government/Govt. undertaking/Local Authority, our bid will be considered as nonresponsive.

Date: (Signature) ____________.
Place: (Print Name) ____________.

______________________________
(Designation)( Seal)

# ई-निविदा दर पत्र

( अ ) वेगवेगळया वस्त्रोद्योग बाबींचे दर( WITHOUT GST)

| अ. क्रं. | कापडाचा प्रकार | | रुंदी से.मी. | वार्प. | वेप्ट | रिड EPI | पिक्स PPI | दर प्रति मिटर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | डाईड / ब्लीच्ड मर्सराईज्ड पॉपलीन | | 89 | 30 | 34 | 80 | 52 | |
| 2 | ग्रे पॉकेटिंग क्लॉथ | | 89 | 30 | 30 | 80 | 52 | |
| 3 | डाईड रेकॉर्ड पॅकींग क्लॉथ | | 89 | 30 | 30 | 80 | 52 | |
| 4 | डाईड कॅसमेंट/हॉस्पिटल क्लॉथ | अ) | 89 (36") | 2/20 | 10 | 60 | 52 | |
| | | ब) | 122 (48") | 2/20 | 10 | 60 | 52 | |
| | | क) | 137 (54") | 2/20 | 10 | 60 | 52 | |
| | | ड) | 152 (60") | 2/20 | 10 | 60 | 52 | |
| 5 | टेरिकॉट साडी 67% पॉलिस्टर 33 % कॉटन | | 118 | 60 पीसी | 60 पीसी | 84 | 84 | |
| 6 | कॉटन साडी/डिझायनर साडी | | 118 | 100 | 120 | 80 | 76 | |
| 7 | दुप्पटा क्लॉथ 100 % नायलॉन | | 84 | 50 | 50 | 76 | 76 | |
| 8 | सर्व डाईड/प्रिटेंड टेरिकॉट शर्टीग 65% पॉलिस्टर 35 % कॉटन डिसबर्स कलर | | 89 | 40 पीसी | 82 डीएन | 88 | 84 | |
| 9 | पी/सी सुटींग व्हाइट/खाकी/नंव्ही ब्ल्यु /सर्व रंगामध्ये 67% पॉलिस्टर 33 % कॉटन | | 137 | 2/30 | 2/30 | 64 | 48 | |
| 10 | पॉलिस्टर कॉटन डाईड शर्टीग 67% पॉलिस्टर 33 % कॉटन आयएस-11815 (1986) | | 89 | 50 पीसी | 50 पीसी | 110 | 90 | |
| 11 | कॉटन वॅट डाईड ड्रील क्लॉथ आयएस -177 (1989) व्हरायटी नं.3 | | 71 | 14 | 12 | 4/48 | 48 | |
| 12 | कॉटन वॅट डाईड ड्रील क्लॉथ आयएस -177 (1989) व्हरायटी नं.4 | | 71 | 14 | 10 | 4/52 | 48 | |
| 13 | खाकी/व्हाईट पी.व्ही.शुटींग 67% पॉलिस्टर 33 % व्हिसकॉस | | 148 | 2/28 पीव्ही | 2/28 पीव्ही | 60 | 60 | |
| 14 | कॉटन ग्रे क्लॉथ फॉर पॅकिंग | | 137 | 16 | 16 | 60 | 52 | |
| 15 | पॉलिस्टर व्हिसकॉस सुटींग पॉलिस्टर 67% व्हिसकॉस 33% आयएस -15853:2009 | | 148 | 2/24 पीव्ही | 2/24 पीव्ही | 56 | 48 | |

| अ. क्रं. | कापडाचा प्रकार | रुंदी से.मी. | वार्प. | वेफ्ट | रिड EPI | पिक्स PPI | दर प्रति मिटर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 16 | सर्व रंगामध्ये टेक्स व्हिसकॉस शर्टीग (व्हाईट/खाकी/नेव्ही ब्ल्यु/ प्रिंटेंड/डाईड/प्लेन व चेक्स) पॉलिस्टर 80% व्हिसकॉस 20% | 89 | 84 डीएन | 2/60 पीव्ही | 126 | 60 | |
| 17 | पॉलिस्टर व्हिसकॉस सुटींग (मेटी) पॉलिस्टर 67% व्हिसकॉस 33% | 148 | 2/18 पीव्ही | 2/18 पीव्ही | 40 | 40 | |
| 18 | पडदा कापड प्लेन (अ) | 112 | - | - | - | - | |
| | पडदा कापड डिझाईन (ब) | 112 | - | - | - | - | |
| 19 | टेबल क्लॉथ | 138 | - | - | - | - | |
| 20 | सुटींग - कापड सर्व रंगामध्ये. | 142 | 160 DN Micra | 2/30 Poly | 104 | 52 | |
| 21 | मल्टी कलर चेक्स शर्टीग | 89 | 80 DN Micra | 30 s Poly | 114 | 62 | |
| 22 | प्लेन शर्टींग/ब्लाऊज पीस कापड | 89 | 80 DN Micra | 40 s Poly | 126 | 86 | |

| | | | दर प्रति नग. |
|---|---|---|---|
| 23 | गादी | Gaadi/Mattress:-<br>Foam + Coir mattress<br>Dimension:72" X36"X4"( 3 Ft. x 6Ft. x 4")<br>Cloth: Polyester / Cotton<br>Made of Sandwich Pattern of 1"PU Foam of 28KG/DM Cube Density on Both Sides.<br>Inner/Middle Core to be Rubberized Coir of 75 KG/DM Cube<br>Outer Fabric Cover Printed,100% Polyester of 80 GSM<br>Foam to be Reversal Make Can Be Used Both Sides. | |
| 24 | उशी | Pillow:- Dimension: 2ft X 1ft X 4 Inch<br>Cloth: Cotton<br>Weight Tolerance : +-5%<br>Weight: 2KG/M Square | |

| | | | |
|---|---|---|---|
| 25 | कॉटन गादी | Cotton Gaadi :- 10 Kg.( 3 Ft. x 6 Ft. ) | |
| 26 | पॉवरलूम बेडशीट (अ) | Bedsheet.(100 % Cotton )<br>Warp 20 S ± 5 %<br>Weft 20 S ± 5 %<br>EPI 56 ± 5 %<br>PPI 60 ± 5 % | |
| | | 1) Size 60 Inch X 90 Inch | |
| | | 2) Size 60 Inch X 100 Inch | |
| | पॉवरलूम बेडशीट (ब) | As per IS 175:1989 Variety No.2<br>**Warp Count – 16s (36 tex) ± 5 %**<br>**Weft Count - 16s (36 tex) ± 5 %**<br>**Ends/cm -24 ± 5 %**<br>**Picks /cm – 24 ± 5 %**<br>**Mass -170 gsm**<br>**Fibre Content -100% Cotton**<br>**Size - 60 Inch X 90 Inch OR As Agreed** | |
| 27 | पिलो कव्हर | Pillow Cover. As per IS 175:1989 Variety No.2 | |
| 28 | पॉवरलूम ब्लॅंकेट/रजई (अ) | Blanket/ Quilt (Razai).<br>Warp /Weft Count : 4 Ne ± 5 %<br>EPI-26 ± 5 %<br>PPI-14 ± 5 %<br>Weight -1375/1400 gms.<br>Size 60 Inch X 90 Inch **OR As Agreed** | |
| | पॉवरलूम ब्लॅंकेट/रजई (ब) | Woolen Blanket - As per IS<br>**Warp Count – 2.35 Ne ± 5 %**<br>**Weft Count – 2.35 Ne ± 5 %**<br>**EPI – 102 ± 5 %**<br>**PPI - 52 ± 5 %**<br>**Weight – 1750 gsm**<br>**Fibre Content –Wool 55%,Cellulosic Fibre 10%, Rayon 10%,other 25%**<br>**Size - 60 Inch X 90 Inch OR As Agreed** | |
| 29 | पॉवरलूम सोलापूरी चादर | Warp Count – 2/20 Ne ± 5 %<br>Weft Count - 6s Ne ± 5 %<br>Ends/Inch - 52 ± 5 %<br>Picks /Inch – 26 ± 5 %<br>Fibre Content -100% Cotton<br>Size - 60 Inch X 90 Inch OR As Agreed<br>Colour Fastness :-Change in colour & Staining of adjacent fabrics - 4 or better | |

| | | | दर प्रति नग. |
|---|---|---|---|
| 30 | Surgeon Dress<br>(Apron & Pant)Readymade | Full Size | |
| 31 | Patients Dress<br>(Female Gown) Readymade | Full Size | |
| 32 | Patients Dress<br>(Female Top Petticoat & Paijama) Readymade | Full Size | |
| 33 | Patients Dress<br>(Male Top and Paijama )<br>Readymade | Full Size | |
| 34 | लेडीज पेटीकोट | Full Size | |
| 35 | टॉवेल 30 X 60 | 30 X 60 | |
| 36 | डॉ. शीट | 1.00 Mtrs. | |
| 37 | होल टॉवेल | 70 Cms. | |
| 38 | टॉली कव्हर | 1.00 Mtrs. | |
| 39 | ओ.टी.ग्रीन टॉवेल | 70 Cms. | |
| 40 | ट्रे कव्हर | 1.5 To 1 Foot | |
| 41 | ॲब्डॉमन सिट | अ) Abdoman sheet H-70Xw-60<br>ब) Abdoman Hole sheet shift H-72Xw-60<br>क) आर्थो प्लेन शिट H-70Xw-60<br>(Specifications 100% Cotton 2/20 X 10s count yarn) | |
| 42 | सर्जन गाऊन/डॉ.गाऊन (अ) | Full Size | |
| | ओव्हर लॅप गाऊन (ब) | Regular Size | |
| | ओव्हर लॅप गाऊन (क) | Full Size | |
| 43 | डॉ.ॲप्रन/नर्सेस ॲप्रन | Any Size | |
| 44 | कॉटन टर्कीश टॉवेल (अ)<br>30" X 60" | As Per IS 7056:1989<br>Warp -16s/2 (36 Tex X 2)<br>Pile-16s (36 Tex )<br>Weft -16s (42 Tex)<br>Ends/dm-100<br>Pile/dm-100<br>Picks/dm-200 | |
| | कॉटन टर्कीश नॅपकीन (ब)<br>16" X 24" | | |

....5/-

| | | | |
|---|---|---|---|
| 45 | कॉटन टॉवेल 30" X 60" (अ)<br>(Huck-a-Back)<br>(चेक्स/लायनिंग/प्लेन )<br>कॉटन नॅपकीन 16" X 24" (ब)<br>(चेक्स/लायनिंग/प्लेन ) | As Per IS 7056:1989<br>Warp -14s (42 Tex)<br>Weft -6s (98 Tex)<br>Ends/dm-360<br>Picks/dm-135 | |
| 46 | रेकॉर्ड पॅकिंग बॅग चैनसहीत | सर्व रंगामध्ये | |
| 47 | डस्टर 21" X 21" | अ) कॉटन | |
| | | ब) मायक्रो फायबर | |
| 48 | तयार शालेय गणवेष | अ) Regular Quality<br>शर्टींग - (६५ %पॉलिस्टर व ३५% कॉटन)<br>वार्प ४० पीसी, वेप्ट ८२ डीएन, रिड ८८, पिक्स ८४<br>सुटींग -(६७ %पॉलिस्टर व ३३% कॉटन)<br>वार्प २/३० पीसी, वेप्ट २/३०पीसी, रिड ६४,पिक्स ४८ | |
| | | ब) Superior Quality<br>शर्टींग - (८० %पॉलिस्टर व २०% व्हिसकॉस)<br>वार्प ८४ डीएन, वेप्ट २/६० पीव्ही, रिड १२६, पिक्स ६०<br>सुटींग -( (६७ %पॉलिस्टर व ३३% व्हिसकॉस)<br>वार्प २/२४ पीव्ही, वेप्ट २/२४ पीव्ही, रिड ५६, पिक्स ४८ | |
| 49 | ट्रॅक सुट ( Track Suits ) | **Fabric Weight-Jacket & Pant<br>220 to 250 gsm<br>(Tolerance: ± 5%)<br>Blend Composition of Material Jacket and Pant<br>100 % Polyester<br>Design Verification<br>Outer knitted fabric with inner side fleece Inside stitching interlock Lower Jacket Elastic Rib with elastic waist with elastic for track pant** | |
| 50 | स्वेटर/ जर्कीग | Acryalic 70%, Wollen 30 %, Wales14, Course 26, Yarn 2/30 (or more) | |
| 51 | लोकरीचे कांबळे/घोंगडी 60" X 120" | 100 % वुलन | |
| 52 | मच्छरदानी | अ) कॉटन 6 फूट X 4 फुट | |
| | | ब) नॉयलॉन 3 फूट X 6 फुट | |
| 53 | रॅपर (Rapper )<br>(Specifications 100% Cotton 2/20 X 10s count yarn) | अ) 40X40 | |
| | | ब) 56 X 56 | |
| | | क) ट्रे रॅपर 12 X 18 | |
| 54 | ग्रीन मास्क | (L-10"XW4") (Specifications 100% Cotton 2/20 X 10s count yarn) | |
| 55 | Cotton Cap- Surgeon | (Specifications 100% Cotton 2/20 X 10s count yarn) | |
| 56 | Baby Blanket | | |
| 57 | baby Turkish Towel<br>अ) Size 20 X 40 | | |
| | ब) Size 24 X 48 | | |

....6/-

## ( ब ) शालेय गणवेष व पी.टी. युनिफॉर्म दर

| अ.क्र. Sr.No. | इयत्ता Std. | मुले-गणवेष दर प्रती संच Boys Uniform rate per Set without GST | | मुली-गणवेष दर प्रती संच Girls Uniform rate per Set without GST | | पिटी युनिफॉर्म P.T. Uniform without GST |
|---|---|---|---|---|---|---|
| | | हाफ पँट,हाफ शर्ट टाय, मोजे व बॅचसह इ.१ ली ते ५ वीHalf Pant, Half Shirt, Tie with batch & Socks | फुल पँट, हाफ शर्ट, टाय मोजे व बॅचसह इ.६ वी ते १० वी Full Pant, Half Shirt, Tie with Batch & Socks | पिनो,ब्लाऊज, टाय, मोजे व बॅचसह इ.१ ली ते ५ वी Pino, blouse tie with Batch & Socks | सलवार कमीज, दुप्पटा, मोजे व बॅचसह इ. १ ली ते १० वी Salwar, Kameez, Dupatta with Batch & Socks | मुलां-मुलीकरीता For Boys-Girls |
| १ | बालवाडी | | | | | |
| २ | १ ली | | | | | |
| ३ | २ री | | | | | |
| ४ | ३ री | | | | | |
| ५ | ४ थी | | | | | |
| ६ | ५ वी | | | | | |
| ७ | ६ वी | | | | | |
| ८ | ७ वी | | | | | |
| ९ | ८ वी | | | | | |
| १० | ९ वी | | | | | |
| ११ | १० वी | | | | | |

**स्पेसिफिकेशन**

प्राथमिक शाळेतील बालवाडी ते १० वी च्या विद्यार्थ्यांना शालेय गणवेष व पी.टी.युनिफॉर्म इ. साहित्याचे विनिर्देश

| Primary to 10th Std. | Uniform |
|---|---|
| Boys (all medium) | Half Pant/Full Pant, Half Shirt,Tie & Socks |
| Girls (all medium except Urdu medium) | Blouse, Pino, Tie & Socks |
| Girls (Urdu medium) | Salwar Kameez, Dupatta & Socks |

**SPECIFICATIONS**

(a) SHIRTING - For Shirt, Blouse, Salwar & Kameez

| Sr.No. | Parameters | Specification | Tolerance |
|---|---|---|---|
| 1 | Warp Count | 80 DN Micro | +/-5 % |
| 2 | Weft Count | 40 P.V | +/-5 % |
| 3 | Blend Composition P/V | 80 : 20 | +/-5 % |
| 4 | Ends/Inchs. | 124 | +/-5 % |
| 5 | Picks/Inchs. | 76 | +/-5 % |
| 6 | Width | 89 cm | +/-5 % |
| 7 | Mass (GSM) | 100 grams | Min |
| 8 | Crease Recovery angle | As per Standard IS 15852:2009 | As per Standard IS 15852:2009 |
| 9 | Pilling Resistance | | |
| 10 | P.H.Value | | |

....7/-

(b) SUITING - For Half Pant, Pino & Tie

| Sr.No. | Parameters | Specification | Tolerance |
|---|---|---|---|
| 1 | Warp Count | 2/30 P.V | +/-5 % |
| 2 | Weft Count | 2/30 P.V | +/-5 % |
| 3 | Blend Composition P/V | 65 : 35 | +/-5 % |
| 4 | Ends/Inchs. | 60 | +/-5 % |
| 5 | Picks/Inchs. | 48 | +/-5 % |
| 6 | Width | 137 cm | $\pm$ 1 cm |
| 7 | Mass (GSM) | 190 grams | Min |
| 8 | Crease Recovery angle | As per Standard IS 15852:2009 | As per Standard IS 15852:2009 |
| 9 | Pilling Resistance | | |
| 10 | P.H.Value | | |

(c) DUPATTA.

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | Blend Composition percent | : | 100 Polyester |
| 2 | Width cms | : | 105 min |

(d) TIE .

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | Std $1^{st}$ to $4^{th}$ | : | 12" |
| 2 | Std $5^{th}$ to $10^{th}$ | : | 14" |

**Sports Uniform Specifications**

**One Sport Uniform Set for Students consist of Full Track Pant and T-Shirt**

**Track Pant :** **Full pant with side lining, having pockets on both sides with chain.**
**Half Sleeve T-shirt with 2 button Placket, Rib Collar, Rib Sleeve Cuff, Side sit and one pocket on left chest side with logo.**

**Fabric Specification for T-Shirt & Track Pant**

| Sr.No. | Description | Requirement | |
|---|---|---|---|
| 1 | Approximate Threads per unit length (Inch) (IS:1963-1981) | Threads (+5% - 2.5%) | |
| | | Wales | 35 |
| | | Course | 102 |
| 2 | Colour Fastness to Artificial Light (Xenon Arc lamp) (BWS 5) (IS 2454) | Rating | 5 |
| 3 | Identification of fiber (IS 667:1981) | Knitted | Polyester |
| 4 | Fiber Blend Composition (%) | Polyester | 100 % |
| 5 | Dimensional Changes to Washing (%) (ISO:6330 & ISO 5077 at 40 deg.After 1 washes, Tumble dry) | Wales | 0.7 (Shrinkage) |
| | | Course | 0.5 (Shrinkage) |
| 6 | Colour Fastness to washing (IS/ISO 105-C10 (A1) at 40 deg.) | Change in Cooler | 4-5 |
| | | Staining on Cotton | 4-5 |
| 7 | Approx. Count of yarn removed from fabric | Knitted | |
| | | Type A | 82 (D) |
| | | Type B | 163 (D) |
| 8 | Mass (g/m2) | 180 (+5%) (-2.5 %) | |

# क - रेनकोट

## Raincoat size chart for Boys & Girls

| Sr. No. | Size | Std | Length | Chest | Shoulder Sleeve to Sleeve | Buttons | Caps Height | Collar | Pocket With Flap (L X B) | Rate without GST |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 24 | Pre-primary | 60 cm | 96 cm | 100 cm | 3 | 23 cm | 35 cm | 14 x 13 | |
| 2 | 28 | I & II | 70 cm | 108 cm | 104 cm | 3 | 23 cm | 35 cm | 14 x13 | |
| 3 | 32 | III & IV | 80 cm | 116 cm | 110 cm | 3 | 23 cm | 37 cm | 14 x 13 | |
| 4 | 36 | V | 90 cm | 124 cm | 126 cm | 4 | 23 cm | 41 cm | 15 x 14 | |
| 5 | 40 | VI | 100 cm | 124 cm | 132 cm | 4 | 23 cm | 41 cm | 15 x 14 | |
| 6 | 44 | VII | 110 cm | 124 cm | 136 cm | 5 | 23 cm | 41 cm | 15 x 14 | |

**Material Specifications of Raincoats for Boys & Girls**

| Items | Items Description |
|---|---|
| **Raincoats for Boys & Girls** | • The P.V.C. Raincoats shall be as per IS: 2076-1981 Type-I and IS: 4761-1968 or as amended up to date.<br>• The raincoats shall be made from good quality flexible polyvinyl material, which shall be free from hazardous contents.<br>• The P.V.C. Material shall be soft and slightly elastic in nature and of 0.175 mm in thickness.<br>• The raincoats shall be leak-proof and durable.<br>• The raincoats should not tear off at the joints and should be provided with zip. The P.V.C. raincoats must have two pockets<br>• The P.V.C. raincoats shall be provided with cap which shall be joined to the top. |

| Sr.No | Particulars | Rate without GST |
|---|---|---|
| 7 | **Rainsuits for Male & Female (All Size)** | |

**Specification of Rainsuit for Male & Female**

| Sr.No | Particulars | Specification |
|---|---|---|
| 1 | Material of Rainsuit | Fabrics made of first grade Polyester and coated with Poly chloroprene |
| 2 | Water Resistance | Resistance to water penetration in centimetre head of water minimum 150 cm |
| 3 | Seam Joints and sealing | All seams and joint should be tapped from inside with heal seal |
| 4 | Mass of finished material (GSM) | 206+5% g/msq |
| 5 | Shirt Pocket | 02 Nos of pockets 6 x 6 inches size with flap on front side of jacket (ensuring proper water proofness of jacket) at waist level i.e lower side of jacket. |
| 6 | Sleeve | Baggies style |
| 7 | Zipper cover | Extra cover on zipper |
| 8 | Hood adjustable | Tying cord with lock |
| 9 | Trouser (pant) waist adjustable | Full round elastic type 2inch wise |
| 10 | Breaking strength in longitudinal and traverse dictation | Wrap minimum 59 kg<br>Weft Minimum 48 Kg |

....9/-

## ड - School Bags

Specifications & Rate

| Sr. No. | Type | Length Minimum (In Inch) | Breadth Minimum (In Inch) | Depth Minimum (In Inch) | Rate without GST |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Type A Class (I and II)<br>Outer Layer - Polyester Fabric<br>(300 X 300 denier)<br>Inner Layer - Flexible PVC<br>Thread – Polyester spun yarn TKT 30<br>No. of stitches – 6-9/25 mm | 15 | 11 | 5 | |
| 2 | Type B Class (IIIand V)<br>Outer Layer - Polyester Fabric<br>(300 X 300 denier)<br>Inner Layer - Flexible PVC<br>Thread – Polyester spun yarn TKT 30<br>No. of stitches – 6-9/25 mm | 16 | 12 | 5 | |
| 3 | Type C Class (VI and VIII)<br>Outer Layer -Polyester Fabric<br>(300 X 300 denier)<br>Inner Layer - Flexible PVC<br>Thread – Polyester spun yarn TKT 30<br>No. of stitches – 6-9/25 mm | 17 | 13 | 6 | |

## Property Specification

| Properties | Unit | Type A Class (I and II) | Type B Class (IIIand V) | Type C Class (VI and VIII) |
|---|---|---|---|---|
| GSM | g/m2 | 370 | 370 | 370 |
| Tensile strength | kgf/cm2 | 13 | 13 | 13 |
| Tear strength | kgf/cm2 | 1.2 | 1.2 | 1.2 |
| Load bearing capacity for 1 hour | kgf/cm2 | 15 | 25 | 25 |
| Shoulder strip Joint Strength | kgf/cm2 | 8 | 8 | 8 |



Signature Not Verified

Digitally signed by SHRIKRISHNA BABURAO PAWAR
Date: 2026.05.04 21:52:40 IST
Location: Maharashtra-MH